# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 28/03/2018 रोजी (का.क्र.प. 23) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

बुधवार दिनांक 28 मार्च 2018 रोजी (का.प.क्र .23) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12-15 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
02. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
03. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

(यावेळी जेष्ठ साहित्यिक व प्राध्यापक डॉ.गंगाधर पानतावणे यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.सभापती : मागच्या बैठकीत प्रशासनाने बजेट सादर केले. त्यात स्पील ओव्हरची काही कामे आली नाही ती घेण्यात यावी. विधी सल्लागार मा.कोर्टाच्या कामासाठी गेलेल्या आहे. नारेगाव येथे कचरा टाकणे संदर्भात कमेटीच्या माध्यमातून मा.कोर्टाने काही सुचना केल्या त्यानुसार तीन महिण्याची मूदत मिळाली आहे.या बाबत मा.महापौर माहिती देतीलच.परंतु तीन महिण्यापर्यंत मनपास योग्य ते नियोजन करावे लागेल.

श्री.राजगौरव वानखेडे : लाड समितीच्या माध्यमातून नोंकर भरती संदर्भात 2015 मध्ये विधान सभा सभागृहात चर्चा झाली होती त्यानुसार चौकशी अधिकारी म्हणून मा.श्री.तुकाराम मुंढे यांची शासनाने नियुक्ती केली होती त्याचा अहवाल त्यांनी दिला त्यात कोणते अधिकारी दोषी आहे व नेमके काय प्रकार झाला होता माहिती दयावी.

मा.अति .आयुक्त : सन 2010-14 या दरम्यान जे अनुकंपावर नोकर भरती झाली त्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा.श्री.तुकाराम मुंढे यांना दिले होते. त्यांनी चौकशी अहवाल दिला त्यात 11 अधिकारी दोषी आहे. एकूण 288 प्रकरणाची त्यांची चौकशी केली त्यातील काही प्रकरणात अनियमितता झाली. त्यात श्री.जावरे, श्री.चारठाणक र,श्री.विलास जाधव, श्री.रविंद्र निकम,श्रीमती सपना वसावा,श्री.अभंग,श्री.आंधळे,श्री. थत्ते श्री.ओ सी सिरसाट,श्री.नाथा चव्हाण, श्री.महावीर पाटणी अशी नावे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : हे प्रकरण आस्थापना 1,2 शी निगडीत आहे असे असतांना या प्रकरणात दोषी असलेले श्री.रविंद्र निकम यांना पुन्हा आस्थापनाचा चार्ज दिला तो देता येतो का ?

अति.आयुक्त : ही प्राथमिक चौकशी आहे आता विभागीय चौकशी शासन स्तरावर होणार आहे त्यांना चार्ज देणे बाबत मा.आयुक्तांनी निर्णय घेतला.

श्री.राजगौरव वानखेडे : श्री.निकम हे या प्रकरणात दोषी आहे हे मा.आयुक्तापर्यत माहिती गेली नाही. असे वाटते त्यामूळेच त्यांना चार्ज दिला असावा. अगोदर ज्यांचेकडे जार्च होता ते सक्षम नव्हते का, त्यांचेकडून चार्ज का काढला.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी खुलासा केला आहे आणखी चौकशी होणे बाकी आहे.

अति.आयुक्त :मा.आयुक्ताशी चर्चा झालेली आहे जी काही सुधारणा करायची ती मा.आयुक्तच करतील.

मा.सभापती :सभागृहाची भावना लक्षात घेता व या प्रकरणाची चौकशी आणख्री होणार आहे मा.आयुक्तानी चौकशीच्या अधीन राहून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे : श्री.निकम यांचेवर आरोप सिध्द झाले आहे असे असतांना चार्ज देणे योग्य नाही ते दोषी नसेल तर चार्ज देण्यास हरकत नव्हती.

अति.आयुक्त : या बाबतीत मा.आयुक्ताशी चर्चा करण्यात येईल.

श्री.ऋषीकेश खैरे : माझे वार्डासाठी पाणी सोडण्यास लाईनमन ला नियुक्ती दिली जात नाही.

कार्य.अभियंता : मंजूरी मिळाली आहे. संचिका आस्थापना विभागाकडे गेली आहे.

मा.सभापती : ताबडतोब कार्यवाही करावी.

श्रीमती संगिता वाघुले : आंबेडकर नगर चौक ते आरतीनगर पिसादेवी रस्त्याचे पॅचवर्कचे काम का होत नाही (या वेळी स.सदस्या श्रीमती वाघुले डायस समोर येऊन बसतात.)

मा.सभापती : आपण आपल्या जागेवर बसावे. खुलासा घेतला जाईल.

कार्य.अभियंता : तीन दिवसात कामास सुरूवात होईल.

मा.सभापती : ताबडतोब काम करावे.

श्रीमती किर्ती शिंदे : आशा वर्ककर यांना फिक्स मानधन देण्याची कार्यवाही करावी बजेट मध्ये तशी तरतूद करावी. हे कर्मचारी मनपासून काम करतात घरोघरी फिरतात.इतर मनपात या कर्मचारयांना फिक्स मानधन मिळते.

आरोग्य अधिकारी : आशा वर्कर यांना कामानुसार मानधन देतो 1500-2000 हजार पर्यत मानधन त्यांना मासिक मिळते.

मा.सभापती : प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी बजेट मध्ये तरतूद करावी.

श्रीमती किर्ती शिंदे : भारतनगर भागातील शाळा पाच वर्षापासून कार्यरत असून त्याचें भाडे 5 हजार आहे. तेथील लाईट, टॅक्स व इतर बाबीमध्ये वाढ झाली आहे नैसर्गीक वाढ 10 टक्के झाली त्याप्रमाणे भाडेमध्ये वाढ करावी.

मा.सभापती : योग्य ते भाडे मिळावे याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे : नागेश्वर वाडी येथील इग्लिश स्कूल चालू होणार आहे त्या शिक्षकांना कॉन्ट्रक्ट बेसवर घेण्यात यावे.

मा.सभापती : योग्य ते नियोजन करून कार्यवाही करावी.

श्री सिताराम सुरे : कचरा प्रकरणा बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आता नारेगाव येथे पुन्हा 3 महिणे कचरा टाकणार आहोत. पुढील तीन महिण्यात योग्य नियोजन करून पुन्हा नारेगाव येथे कचरा जाणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे : यापूर्वी नारेगावच्या लोकांनी चार महिण्याची मूदत दिली होती त्यावेळी कार्यवाही काहीच केली नाही आता तीन महिणेचा अवधी मा.कोर्टाने दिला आहे थोडा दिलासा मिळाला आता पावसाळा येणार आहे तीन महिण्यात प्रोसेस युनीट चालू करावे युध्द पातळीवर काम करावे कचरा विल्हेवाटीसाठी जागा फायनल करून योग्य ते नियोजन करून कार्यवाही करावी.

श्रीमती किर्ती शिंदे : जो कचरा जमा होतो त्यावर जंतुनाशक पावडर टाकावे परत पुन्हा विरोध होणार नाही याची दखल करावी.

मा.सभापती : प्रशासनाने योग्य ते नियोजन करावे.

| | |
|---|---|
| श्री.सोहेल शेख | : वार्ड अधिकारी श्रीमती खरपे मॅडम यांनी आमच्या भागात येऊन एका जागेवर विना सम्मती कचरा टाकण्याचे निश्चित केले होते ते योग्य नाही. |
| श्रीमती नरगीस शेख | :वायएसके हॉस्पीटलला पैसे भरण्याची नोटीस दिली असे असतांना पुन्हा कम्प्लीशन प्रमाणपत्र देण्यात आले हे योग्य नाही. |
| श्री.अजीम अहेमद | :परवानगी दिली त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम केले असे असतांना पार्ट कम्पीशन दिले जाते हे योग्य आहे काय ? |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी येथे नाही. संबधीत संस्थेने शासनाकडे अपील केले होते शासनाच्या निर्देशनुसार कार्यवाही केली आहे. मा.कोर्टात प्रकरण चालू आहे पुढील सभेत माहिती घेता येईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : मा.महापौर यांनी काही ठिकाणी लाइटची पाहणी केली लाईट बंद असल्याचे निदर्शनास आले त्यांनी ते लाईट तपासणीसाठी पाठविले त्याचा अहवाला आला का ? |
| श्री.सिताराम सुरे | : जळगाव रस्त्यावरील अनेक एलईडीचे लाईट बंदच आहे चालू केले तर चालूच राहतात.किती वॅटचे लाईट लावलेले असतात. |
| उपअभियंता-देशमूख | : इंजिनिअरींग कॉलेजला तपासणीसाठी पाठविणार आहे आतापर्यत तपासणी झालेली नाही, यात 75,50,90 वॅटचे लाइट असतात. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : हर्सुल टी पॉईन्ट ते जटवाडा रोडवर या लाईटचा प्रकाश एकाच बाजूने पडतो या लाईटचा उजेड कमी आहे एलईडीचे जे इनचार्ज असतील त्या एजन्सीचे लोकांना येथे माहिती देणेसाठी पुढील सभेत बोलावे. |
| मा.सभापती | : पुढील सभेत संबधीताना बोलवावे. |
| श्री.सयद मतीन | : टी बी हॉस्पीटल ते आरेफ कॉलनी रस्त्यातील लाईट नवीन लावलेले आहेत परंतु त्याचा प्रकाश कमी आहे पुर्वीचे लाईट चांगले होते असे नागरीकांचे म्हणणे आहे. मोठया व्हॅटचे लाईट लावावे. पुर्वीच्या फिटींग कुठे ठेवल्या आहे.माहिती दयावी. |
| श्री.नरगीस खान | : हमखास मैदान कॅन्सर हॉस्पीटल समोरील लाईट बंद असतात. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी पुढील सभेत सर्व माहिती सादर करावी जास्त व्हॅटचे लाईट लावावे.जून्या फिटींग चांगल्या ठेवाव्या व वापरात आणाव्या. |
| श्री.सयद मतीन | : पाणी पुरवठयाचे कामाचे टेंडर कोणी घेत नाही ज्यांना काम दिले ते काम करीत नाही. दुसरा पर्यायी मार्ग काढावा व पाणीपुरवठयाची सर्व कामे तातडीने करावी. |
| कार्य.अभियंता-पापू | : ठेकेदाराची बिले देणे आहे त्यामूळे कामे करीत नाही. |
| मा.सभापती | : प्रशासनाने दखल घ्यावी, पाईप पुरवठा करणे बाबत योग्य नियोजन करावे टेंडरची कार्यवाही करावी. |
| कार्य.अभियंता -पापू | : डायरेक्ट कंपनीकडून पाईप पर्सेस करणेची कार्यवाही केली होती कंपनी ॲडव्हान्स पैसे मागत आहे. |
| शहर अभियंता | : निविदा मध्ये काय अटी शर्ती होत्या मनपाचे नियम काय आहे त्यानुसार कार्यवाही करावी लागेल. |
| मा.सभापती | : शहर अभियंता यांनी या बाबत दखल घ्यावी. |
| श्रीमती स्वाती नागरे | : महिला बाल कल्याण समितीच्या माध्यमातून या वर्षी कोणते साहित्य वाटप करण्यात आले. |
| मा.सभापती | : सबंधीत अधिकारी उपस्थित नाही. प्रशासनाने याची दखल घ्यावी. |
| श्रीमती राखी देसरडा | : माझे वार्डात घनकचरा कामासाठी एक जवान कर्मचारी दयावे. |
| मा.सभापती | : प्रशासनाने एक कर्मचारी त्वरीत दयावे. |
| श्रीमती संगिता वाघुले | : माझे वार्डात एका मुलीला कुत्रा चावला त्या मुलीच्या घरची आर्थीक परीस्थिती चांगली नाही. मदत मिळावी म्हणून मी पत्र दिले कार्यवाही होत नाही. |
| मा.सभापती | : आवश्यक ती आर्थीक मदत करावी. |

श्री.साहेल शकील : माझे वार्डासाठी डस्टबीन्स संचिका सादर आहे मंजूरी मिळत नाही.

श्रीमती संगिता वाघुले : डस्टबीन्स सचिंका ताबडतोब मंजूर कराव्यात.

मा.सभापती : मा.आयुक्तांकडे संचिका मंजूरीसाठी असेल तर सबधीत अधिकारी यांनीशहर अभियंता यांना जे अधिकार दिले त्यांचे अधिकारात मंजूरी देता येत असेल तशी कार्यवाही करावी.

**विषय क्र. 348 : (कार्य.अभि.-1 ते 3 व 8)**

(विषय क्र.337 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.21/03/2018 (का.प.क्र.21) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

विषय : केंद्र शासन पुरस्कृत अमृत मिशन अभियांना अंतर्गत सिडको बसस्थानक ते जळगाव रोड, पारिजातनगर, जालाननगर उद्यान येथे हरित पट्टे विकसीत करणे या कामाचे ठेकेदार मे.तेजस सुपर स्ट्रक्चर प्रा.लि. यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 07.06% कमी दराने म्हणजेच र.रू.1,39,39,908/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. 2017-AMCA-221470-4

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 |
| 2. | कामाचे स्वरुप | केंद्र शासन पुरस्कृत अमृत मिशन अभियांना अंतर्गत सिडको बसस्थानक ते जळगाव रोड, पारिजातनगर, जालाननगर उद्यान येथे हरित पट्टे विकसीत करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे. मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1055 दिनांक 20/05/2017 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,49,98,825/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा सूचना पत्र दिनांक 25/05/2017<br>ई निविदा प्रसिध्दी प्रथम सूचना दि.03/07/2017<br>ई निविदा प्रसिध्दी द्वितीय सूचना दि.03/08/2017<br>ई निविदा प्रसिध्दी तृतीय सूचना दि.09/08/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 28/08/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 30/08/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 5 (पाच) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.तेजस सुपर स्ट्रक्चर प्रा.लि. | 1,49,98,825/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.06% कमी दराने (सात पॉईट सहा % कमी दराने) |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागू नाही. |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मुलभुत सोईसुविधांचा विकास अंतर्गत50%केंद्रशासन 25% राज्य शासनव 25% महापालिकेचा हिस्सा |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | राज्य व केंद्र शासनाचा निधी अद्याप अप्राप्त. संचिकेत लेखा विभागाने मनपा हिस्याचा निधी उपलब्ध करून दिला आहे. |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | सदरील काम 50% केंद्र शासन 25% राज्य शासन व 25% मनपा हिस्सा अशी आर्थिक तरतूद आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | लागू नाही. |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.तेजस सुपर स्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून 7.06% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,49,98,825/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्रमांक 348 ते 351 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासन पुरस्कृत अमृत मिशन अभियांना अंतर्गत सिडको बसस्थानक ते जळगाव रोड, पारिजातनगर, जालाननगर उद्यान येथे हरित पट्टे विकसीत करणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.तेजस सुपर स्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून 7.06% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,49,98,825/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 349 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, झोन क्र.6 अंतर्गत तिरूमला मंगल कार्यालय ते जयभवानीनगर शिवाजी चौक पर्यंत दुभाजक बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.49,96,350/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.49,96,350/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.6 अंतर्गत तिरूमला मंगल कार्यालय ते जयभवानीनगर शिवाजी चौक पर्यंत दुभाजक बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,96,350/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 350 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.65 एन-1 सिडको, मारोती ॲटोमोबाईल व सिडको बस स्टँड मागील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार र.रू.47,48,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.10/02/2018 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प 2017-2018 लेखाशिर्ष शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे, जी.बी.आर.वार्ड-07, पृष्ठ क्र.50 अ.क्र.01, र.रू.1.00 कोटी तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.47,48,000/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.65 एन-1 सिडको, मारोती ॲटोमोबाईल व सिडको बस स्टँड मागील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.47,48,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 351 : (कार्य.अभि.पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मोहन नामदेव चव्हाण, (मजुर) पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) यांनी त्यांच्या स्वतःच्या Coronary Angioplasty या आजारावर कमलनयन बजाज रूग्णालय, औरंगाबाद येथे उपचारासाठी एकूण रूपये 1,50,000/- (अक्षरी रू.एक लाख पन्नास हजार फक्त) अग्रीम

म्हणुन कमलनयन बजाज रूग्णालय, औरंगाबाद यांचे नावे अदा करण्यात आले होते. संबंधीत कर्मचाऱ्याने त्यांच्या स्वतःच्या औषध उपचारासाठी रू.2,66,989/- (अक्षरी रू.दोन लाख सहासष्ठ हजार नऊशे एकोन्नवद फक्त) इतका खर्च केलेला आहे. श्री.मोहन नामदेव चव्हाण यांनी खर्च केलेल्या रू.2,66,989/- (अक्षरी रू.दोन लाख सहासष्ठ हजार नऊशे एकोन्नवद फक्त) रकमेपैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.9518/- (अक्षरी रू.नऊ हजार पाचशे अठरा फक्त) वजा जाता रू.2,57,471/-(अक्षरी रू.दोन लाख सत्तावन्न हजार चारशे एकाहत्तर फक्त) व अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.2,31,723/- (अक्षरी रू. दोन लाख एकतीस हजार सातशे तेवीस फक्त) तसेच त्यामधुन एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.13,349/- (अक्षरी रू.तेरा हजार तीनशे एकोणपन्नास फक्त) मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. संबंधीताच्या नावे असलेल्या अग्रीम रक्कम रू.1,50,000/- (अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार फक्त) रक्कमेसह रू.2,18,374/- (अक्षरी रू.दोन लाख अठरा हजार तीनशे चौऱ्याहत्तर फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चास मंजुरी होणे आवश्यक आहे. तसेच संबंधीतांना अदा केलेली रक्कम रू.1,50,000/-(अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार फक्त) मनपा फंडात वळते करून अग्रीम समायोजन मान्य करून उर्वरीत रक्कम रू.68,374/- (अक्षरी अडुसष्ट हजार तीनशे चौऱ्याहत्तर फक्त) संबंधीतास अदा करण्याच्या मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मोहन नामदेव चव्हाण, (मजुर) पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) यांनी त्यांच्या स्वतःच्या Coronary Angioplasty या आजारावर कमलनयन बजाज रूग्णालय, औरंगाबाद येथे केलेल्या उपचारासाठी आलेल्या र.रू.2,66,989/- (अक्षरी रू.दोन लाख सहासष्ठ हजार नऊशे एकोन्नवद फक्त) खर्चास व श्री.मोहन नामदेव चव्हाण यांनी खर्च केलेल्या रू.2,66,989/- (अक्षरी रू.दोन लाख सहासष्ठ हजार नऊशे एकोन्नवद फक्त) रकमेपैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.9518/- (अक्षरी रू.नऊ हजार पाचशे अठरा फक्त) वजा जाता र.रू.2,57,471/-(अक्षरी रू.दोन लाख सत्तावन्न हजार चारशे एकाहत्तर फक्त) व अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.2,31,723/- (अक्षरी रू. दोन लाख एकतीस हजार सातशे तेवीस फक्त) तसेच त्यामधुन एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.13,349/- (अक्षरी रू.तेरा हजार तीनशे एकोणपन्नास फक्त) मनपा फंडात जमा करून तसेच संबंधीताच्या नावे असलेल्या अग्रीम रक्कम रू.1,50,000/- (अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार फक्त) रक्कमेसह रू.2,18,374/- (अक्षरी रू.दोन लाख अठरा हजार तीनशे चौऱ्याहत्तर फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चास तसेच संबंधीतांना अदा केलेली रक्कम रू.1,50,000/-(अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार फक्त) मनपा फंडात वळते करून अग्रीम समायोजन मान्य करून उर्वरीत रक्कम रू.68,374/- (अक्षरी अडुसष्ट हजार तीनशे चौऱ्याहत्तर फक्त) संबंधीतास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 352 :**

विषय : औरंगाबाद शहरातील भगवान महावीर उड्डाणपुल ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून B-2 निविदा दराप्रमाणे (कंत्राटदाराने सादर केलेले Item Rate नुसार) रक्कम रू.2,07,24,997/- च्या निविदेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दरपत्रक दि.19/03/2018

महोदय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.09 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे डांबरीकरण |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.30/01/2018 विषय क्र.252 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,99,98,582/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 13 मार्च 2018 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 19 मार्च 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | 2,07,24,997/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.632% जास्त दराने |
| 2 | मे.चारनिया कन्स्ट्रक्शन | 2,17,64,091/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.282% जास्त दराने |
| 3 | मे.व्हि.बी.ए. इंफ्रा. | 2,35,66,871/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.843% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | --- |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | प्रचलित दराने (Trends नुसार) |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | जिल्हा विकास योजनेतून विशेष रस्ते अनुदान अंतर्गत |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.सर्वसाधारण सभा दि.30/01/2018 विषय क्र.252 नमुना जोडला आहे. |
| | तरी विषयांकिंत काम ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून B-2 निविदा दराप्रमाणे (कंत्राटदाराने सादर केलेले Item Rate नुसार) र.रू.2,07,24,997/- ची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील भगवान महावीर उड्डाणपुल ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्या B-2 निविदा दराप्रमाणे (कंत्राटदाराने सादर केलेले Item Rate नुसार) रक्कम रू.2,07,24,997/- च्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

मा.सभापती :कै.साहेबराव लक्ष्मण पगडे, पंप ऑपरेटर, जायकवाडी विभाग फारोळा व कै.तात्यासाहेब प्रकाश देशपांडे,फिल्टर ऑपरेटर, जायकवाडी विभाग फारोळा येथे कार्यरत होते. कार्यरत असतांना दोघांचाही मृत्यु झालेला आहे. त्यांच्या मृत्युनंतर मनपाचे

निवासस्थान सोडतांना त्यांना उशीर झाल्यामुळे, प्रशासनाने त्यांना दंड आकारून भाडे आकारणी केलेली आहे. त्यांच्या पत्नीने माझ्याकडे स्वतंत्ररित्या विनंती अर्ज देऊन विनंती केलेली आहे की, त्यांना आकारण्यात आलेला दंड व भाड्याच्या रक्कमेमध्ये कपात करण्यांत यावी. तरी संबंधीताची विनंती मान्य करण्यांत येते, त्यांना निवासी दराने (रेडीरेकनर) नुसार प्रशासनाने दर आकारणी करावी, यास मंजुरी देण्यांत येते.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) : दंड लावण्यात आला तो नियमाप्रमाणे आहे दंड माफ केला तर जे कुणी निवृत्त होतील कामावर नसतील. ते निघून जातील व वसुली करणे अवघड होईल. त्यांना नोटीस दिली होती त्यानी ते घर निवासस्थान रिकामे केले नाही.

मा.सभापती : या सभागृहाने निर्णय घेतला आहे त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच मा.महापौर यांचे पत्र नुसार कचरावर टाकणेसाठी पावडर खरेदी करणे संदर्भात सुचना आहे ते त्वरीत खरेदी करावे व शहरासह सर्वच भागातील व पदमपूरा भागात मोठा कचरा साचलेला आहे तेथे जंतुनाशक पावडर तातडीने टाकावे.शहराच्या मध्यवर्ती भागात कटकटगेटच्या बाजूला असलेला तबेला बंद करण्याची कार्यवाही वार्ड अधिकारी यांनी करावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद